# University of Mumbai

परीक्षा विभाग/ विज्ञान कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०००९८

क्र.परीक्षा/विज्ञान/९१५५/२०१४

**परिपत्रक :–**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, रत्नागिरी उपकेंद्राचे समन्वयक व ठाणे उपकेंद्राचे मानद सल्लागार यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, विद्यापीठ परिपत्रक क्र. परीक्षा/विज्ञान/३९२४/२०१४ दि. १५ डिसेंबर, २०१४ नुसार खालील नमुद केलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रथम सत्र – २०१५ च्या (एप्रिल/मे २०१५ च्या) मध्ये होणाऱ्या परीक्षांचे परीक्षा आवेदन पत्र Digital University Portal वरून Online स्विकारण्यात येणार असून याबाबत लवकरच परिपत्रक निर्गमित करण्यात येतील असे कळविण्यात आले होते. तसेच सत्र–६ च्या नियमित (Fresh) विद्यार्थ्यांचे Digital University Portal वर प्रवेश देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे असेही कळविण्यात आलेले आहे.

T.Y.B.A. (Sem.V & VI) (CBSGS) (60:40 & 75:25 Pattern), T.Y.B.Com. (Sem.V & VI) (CBSGS) (60:40 & 75:25 Pattern), T.Y.B.Sc. (Sem.V & VI) (CBSGS) (60:40 & 75:25 Pattern), T.Y.B.Sc.(IT) (Sem.V & VI) (CBSGS) (75:25 Pattern), T.Y.B.Sc. (Hospitality Studies) (Sem.V & VI) (CBSGS) (75:25 Pattern), T.Y.B.Com.(Banking & Insurance) (Sem.V & VI) (CBSGS) (75:25 Pattern), T.Y.B.Com. (Accounting & Finance) (Sem.V & VI) (CBSGS) (75:25 Pattern), T.Y.B.Com. (Finance & Marketing) (Sem.V & VI) (CBSGS) (75:25 Pattern), T.Y.B.M.S. (Sem.V & VI) (CBSGS) (75:25Pattern)

तरी वरील अभ्यासक्रमांच्या सत्र–६ च्या नियमित (Fresh) विद्यार्थ्यांचे Digital University Portal वर प्रवेश करण्याची शेवटची तारीख १० जानेवारी, २०१५ ही असून; या तारखेनंतर D.U.P. वर प्रवेश नोंदविता येणार नाही याची नोंद घ्यावी. ज्या विद्यार्थ्यांची प्रवेशाची नोंद D.U.P. वर होणार नाही त्यांचे परीक्षाअर्ज Inward करण्यासाठी महाविद्यालयांच्या Login मध्ये उपलब्ध होणार नाहीत.

वरील अभ्यासक्रमांचे Digital University Portal वरून परीक्षा आवेदन पत्र स्विकारण्याबाबतचा तारखांचा तपशिल खालीलप्रमाणे आहेत :–

| परीक्षा शुल्क | महाविद्यालयाने Online अर्ज भरण्याची व Inward करण्याची तारीख | महाविद्यालयाने Form ubmission Report व विहित फी विद्यापीठात जमा करण्याची तारीख |
|---|---|---|
| नियमित फी | ०५/०१/२०१५ ते २०/०१/२०१५ | २३/०१/२०१५ |
| विलंब शुल्क रू. १००/– | २१/०१/२०१५ ते २७/०१/२०१५ | २९/०१/२०१५ |
| विलंब शुल्क रू. ५००/– | २८/०१/२०१५ ते ३१/०१/२०१५ | ०३/०२/२०१५ |

वर नमुद केलेल्या तारखांच्या तपशिलाप्रमाणे महाविद्यालयांनी योग्य ती कार्यवाही करून Form Submission Report व विहीत परीक्षा शुल्क परीक्षा विभागात हस्तेपोच जमा करावेत; पोस्टाने अथवा कुरिअरने पाठविल्यास स्विकारले जाणार नाहीत तसेच आवेदन पत्रांच्या प्रती (Examination Form Prints) विद्यापीठाकडे पाठवू नयेत. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे सत्र–१,२,३ व ४ चे Lower Exam Report (Credit & Grade) हे त्वरित Portal वर नोंदवावेत.

तसेच पुढे संबंधितांना असेही कळविण्यात येते की, ऑक्टोबर २०१४ च्या परीक्षांमध्ये प्रविष्ठ होऊन अनुत्तिर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे एप्रिल/मे २०१५ च्या परीक्षांसाठीचे परीक्षा आवेदनपत्र संबंधित परीक्षेच्या निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत D.U.P. वरून Online भरावेत. अशा विद्यार्थ्यांचे अर्ज विलंब शुल्काने ~~घेतले~~ स्विकारले जाणार नाहीत.

नियमित विद्यार्थ्यांचे परीक्षांचे शुल्क Form Submission Report बरोबर पाठविताना अंतिम सत्राच्या परीक्षा शुल्कामध्ये रू. २५०/– पदवी प्रमाणपत्र शुल्क फी (कन्व्होकेशन फी) भरणे अनिवार्य राहिल.

परीक्षा अर्ज विद्यापीठात सादर करण्याच्या शेवटच्या तारखेनंतर परीक्षा अर्ज विद्यापीठात स्विकारले जाणार नाहीत.

वरील सर्व बाबींची संबंधीतांनी नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

(दिनेश भोंडे)
परीक्षा नियंत्रक

स्थळ : मुंबई.
दि. ३१ डिसेंबर, २०१४.

प्रति,
सर्व संचालक/विभागप्रमुख विद्यापीठ विभाग तसेच मान्यताप्राप्त संस्था, प्राचार्य सर्व संलग्नीत महाविद्यालये